भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६५०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०९/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक १६/०९/२०१७ चे ०९.०० ते ०९.३० वा दर. यातील फिर्यादी नितीन देवाजी वंजारी वय २५ वर्ष, रा. वळद पुनर्वसन हा आपले होंडा कंपनीची ड्रिम युगा काळया रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस ७०५४ किंमती २०,०००/–रु. ची शास्त्री वार्ड बेला परमात्मा एक भवन जवळ ठेवली कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही पाहुन चोरुन नेल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आत्राम पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) महिलांना अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०९/२०१७ चे २२.०० वा दर. यातील फिर्यादी व इतर महिला भिम गिताची तामील करीत असतांनी यातील आरोपी हा रामचंद्र रामटेके यांचे घरासमोर दारु पिवुन येवुन या दारुबंदी समितीच्या बायांना अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी देवुन अंगातील कपडे काढुन रोडवर झोपला असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**३) आग लागुन जळून औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक १५/०९/२०१७ चे ११.०० यातील मृतक श्रीमती सुकनबाई श्रीराम राहांगडाले वय ७५ वर्ष, रा. साखळी ही चुलीवर पाणी गरम करण्याकरीता चुलीवर काड्या पेटवत असतांनी बाजुला ठेवलेल्या दिवाची आग मृतकच्या पदराला लागुन ६० टक्के जळाल्याने तिला औषधोउपचारास सरकारी दवाखाना तुमसर येथे नेवुन उपचार करुन तेथुन पुढील उपचारा करीता डॉक्टरनी रेफर केल्याने दिनांक १४/०९/२०१७ ला सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान १५/०९/२०१७ चे ११.०० वा. दर. मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पो. स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. तांडेकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावने पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १७/०९/२०१७ चे १३.३५ वा. दर. यातील मृतक मुनीराज मारोती गजभिये वय ५६ वर्ष, रा. सेलोटी हा किडणीच्या आजाराने त्रस्त असुन नत्थु रामटेके यांचे पडक्या घराचे छपरीच्या पाटयाला नायलॉन दोरीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी तुलाराम श्रीराम बोरकर वय ६५ वर्ष, रा. सेलोटी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) अवैध दारू/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक १७/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, गोबरवाही व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून १५ लिटर हा.भ. दारू किंमती १३००/–रु, तसेच जुगारातुन किंमती १९७०/–रु. असा एकुण किंमती ३,२७०/–रु. माल जप्त करण्यात आला आहे.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १७/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०१ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.